# पक्षांतर व पक्षप्रवेशाच्या घावूक बाजारात फुलेआंबेडकरी चळवळ!

## (पुर्वार्ध व उत्तरार्ध एकत्रित वाचा)

सध्या पक्षांतराची लाटच आलेली आहे. हिंदूत्व धोक्यात येताच काही धर्मवीर आख्खा पक्षच फोडतात, तर काहींचा स्वाभीमान धोक्यात येतो म्हणून पक्षांतर करतात आणी काही महाभाग पुरोगामी चळवळ वाढवायची म्हणून पक्षांतर करतात. **आपल्या फुलेआंबेडकरी चळवळीचे किती भाग्य(?) मोठे की जीला वाचविण्यासाठी मोठमोठे नेतेमंडळी या पक्षातून त्या पक्षात जाऊन नेहमीच धडपड करीत असतात,** अर्थात त्यांची धडपड कोणाच्या सत्कारणी लागते, हा अभ्यासाचा विषय ठरू शकतो.

पक्षांतर करणे वाटते तेव्हढे सोपे नाही. काय काय कसरती कराव्या लागतात. सर्वात महत्वाचे म्हणजे या पक्षांतराला तात्विक मुलामा द्यावा लागतो. छगन भुजबळसाहेबांना शिवसेनेतून कॉग्रेसमध्ये पक्षांतर करतांना ओबीसी मंडल आयोगाचा तात्विक मुलामा द्यावा लागला. त्यावेळेही आणी आताही त्यांना ओबीसी चळवळ किती समजलेली आहे, असा गैरसोयिचा प्रश्न कुणी विचारू नये! त्यानंतर शरद पवारसाहेबांनी कॉग्रेस सोडून अनेकवेळा नवनवे पक्ष स्थापन केलेत. एकदा समाजवादी नाव घेतले व दुसऱ्यांदा राष्ट्रवादी! आता त्यांना आजही किती समाजवाद अवगत झालेला आहे व त्यांचा सरंजामी राष्ट्रवाद किती उच्चप्रतिचा आहे, हा संशोधनाचा भाग असू शकतो.

**राजकारणाचा उघड-उघड बाजार झालेला असतांना तत्वासाठी पक्षांतर करणे अथवा निस्वार्थ बुद्धीने पक्षांतर करणे, यावर कुणीही विश्वास ठेवायला तयार नाही.** तशातही पक्षांतर करणारी मंडळी पुरोगामी वा क्रांतीकारक असली तर त्यांचे पक्षांतर लोकांच्या गळी उतरवण्यासाठी त्यांचेजवळ जबरदस्त मुद्दे असतात. उदाहरणार्थ- कॉम्रेड कन्हैय्याचे पक्षांतर! भाजपा सरकारने लोकशाही व संविधानच धोक्यात आणलेलं आहे, ते वाचविण्यासाठी कम्युनिस्ट तत्वज्ञान व कम्युनिस्ट पक्षही असमर्थ आहे, म्हणून कन्हैया लोकशाही वाचविण्यासाठी कॉग्रेसमध्ये गेला, त्यासोबत अपक्ष असलेला गुजराथचा जिग्नेशही गेला. आता कॉग्रेस किती लोकशाहीवादी आहे आणी हे दोघे क्रांतिकारक तिथे

जाऊन काय उजेड पाडतात, हाही अभ्यासाचा विषय असू शकतो. **दगडापेक्षा वीट मऊ असे एक नवेच तत्वज्ञान जन्माला घालून कॉंग्रेसचे समर्थन केले जाते. दगडाने डोके फुटते तसे वीटसुद्धा डोके फोडण्याचेच काम करू शकते, हे या महानुभावांना कोण सांगणार? हंडोरेंचे डोके दगडाने नव्हे तर वीटेने फोडलेले आहे.**

प्रत्येक सामाजिक वा सार्वजनिक कृतीला जसे वैचारिक, जात-वर्गीय कंगोरे असू शकतात, तसे व्यक्तीगत कंगोरेही असतातच! परंतू आपल्याकडे व्यक्तीगत मुद्द्यांना अवास्तव महत्व दिले जाते, हे खरे असले तरी हे मुद्दे दुर्लक्ष्य करूनही चालत नाही. कारण या व्यक्तीगत महत्वाकांक्षा इतक्या सैतानी असतात की त्यात देश. धर्म, समाज, जात, वर्ग व त्यांचं तत्वज्ञान पार चिपाड होइपर्यंत वापरलं जातं!

भारतासारख्या जातीव्यवस्थाक देशात जात व धर्माचा सर्वात जास्त वापर पक्षांतरसाठी केला जातो. जातीचे किंवा जातितील प्र्थापितांचे हितसंबंध फार प्रभावशाली असतात. आपल्या जातीचा माणूस आमदार-खासदार-मंत्री झाला पाहिजे, ही भावना इतकी प्रबळ असते की, त्यासमोर कोणतेही विचार वा तत्वज्ञान टिकत नाही. **जातीचा नेता भ्रष्टाचारी, बलात्कारी, चोर-दरवडेखोर काहीही असला तरी चालेल परंतू तो मंत्री झाला पाहिजे.** त्यासाठी मोर्चे-आंदोलने करणाऱ्या जाती आहेत. एखाद्या गुन्हेगाराला शिक्षा झाली पाहिजे, असे सांगणारा त्याच्या जातीचा एकही माणूस तुम्हाला सापडणार नाही. याउलट तो गुन्हेगार आमच्या जातीचा आहे, म्हणूनच त्याला त्रास देण्याचा प्रयत्न होतो आहे, असेच सांगीतले जाते. **या गुन्हेगार माणसामुळे आपल्या जातीचं नाक कापलं गेलं, जातीची बदनामी झाली, असं सांगणारे कुणीही भेटणार नाही, उलट त्या गुन्हेगारसाठी सहानुभुतीची प्रचंड मोठी लाट जातीतून निर्माण होत असते.**

या गुन्हेगारांना नेता बनविण्याचं काम प्रस्थापित पक्षच करीत असतात. भारताच्या निवडणूकप्रधान लोकशाहीत जातींच्या मतपेटीची गोळाबेरीज करावी लागते. संख्येने मोठ्या असलेल्या किंवा सामाजिकदृष्ट्या प्रभावशाली असलेल्या जातीतून जाणीवपूर्वक अशाच व्यक्तींना तिकीटे वा पदे देऊन मोठे केले जाते, ज्या व्यक्ती नियंत्रणात राहतील.

अर्थात काही पक्ष आपला पुरोगामी चेहरा दाखवण्यासाठी काही पुरोगामी सिलिब्रटींना पक्षातर्फे आमदारकी वगैरे देत असतात. राजकारणातील दिग्गज नेतेसुद्धा आपला पुरोगामी चेहरा जतन करण्यासाठी असा उद्योग करीत असतात. अशा दिग्गज नेत्यांमध्ये शरद पवार हे एक नाव घेता येईल. मध्यंतरी शरद पवारांनी डॉ बाबा आढाव यांच्या स्कूलमधील काही कार्यकर्त्यांना आमदार बनविले होते. **पुरोगामी कार्यकर्त्या-नेत्यांना आमदार-खासदार बनविल्याने पुरोगामी चळवळीला काही फायदा झाला आहे, असे आजपर्यंत तरी घडलेले नाही.** मात्र त्याचा फायदा त्या दिग्गहज नेत्याला व त्याच्या पक्षाला निश्चितच होतो. ज्या कार्यकर्त्यांना आमदार-खासदार बनविले, त्यांनी चळवळीची उंची वाढविण्याएवजी स्वतःची आर्थिक उंची वाढवली. एखादी अनुदानित शिक्षण संस्था, आश्रमशाळा मिळाली की हे कोंड्या-खुशाल होतात. सत्तेचा वापर करून चळवळ मोठी करण्याऐवजी सत्तेच्या दडपणाखाली हे लोक खुजेच राहतात व पवारसारख्या सरंजामदारांना जोहार घालत राहतात.

चळवळीत आलेले कार्यकर्ते अभ्यास करतात. वाचन लेखन चिंतन करून लेखक, साहित्यिक बनतात. काहींच्या सुप्त गुणांना वाव मिळतो, ते वक्ते होतात, कलाकार होतात. त्यातील लाखातला एखादाच निळू फुलेंसारखा कार्यकर्ता शेवटपर्यंत चळवळीशी एकनिष्ठ राहतो. बाकीचे बहुतेक सर्व केव्हाही, कुठेही जोहार घालन्यासाठी तयारच असतात.

**काही प्रासंगिक कारणास्तव व अस्तित्व टिकविण्याच्या धडपडित शिवसेनासारख्या पक्षाला शेंडी-जाणव्याच्या कट्टर हिंदुत्वाला सोडचिठ्ठी द्यावी लागली.** आधीचं हातातलं सोडून देत असतांना पळत्याच्या पाठीमागे धावावे लागते. जुनी आयडेंटी व नवी आयडेंटी यांच्या क्रायसिसमध्ये काही लोकांचा बळी जातो, तसे चाळीस बळी शिवसेनेला द्यावेच लागलेत. आज शिवसेनेला कोणते हिंदूत्व अभिप्रेत आहे, याची काहीहि स्पष्टता नाही. ते प्रबोधनकारांचे नाव आजोबा म्हणून घेतात की कट्टर ब्राह्मण्यविरोधी म्हणून घेतात याबाबत साशंकता आहे. राम विरूद्ध शंबुक या संघर्षात ते आजही रामालाच आदर्श

मानित आहेत. भाजपाचा ब्राह्मणी राम सोडवेना आणी पुरोगामी चळवळीचा शंबुक स्वीकारवेना अशी द्विधा अवस्था आहे.

तरीही आमचे कट्टर आंबेडकरवादी शिवसेनेच्या प्रचंड प्रेमात पडलेले आहेत. शिवसेनेला सध्या आपला पुरोगामी चेहरा निर्माण करायचा आहे, त्यामुळे काही पुरोगामी त्यांच्या गळाला लागत आहेत. शिवसेनेत प्रवेश घेत असलेल्या पुरोगामी व्यक्तींचे अभिनंदन करण्यात सर्वात जास्त पुढाकार दलित साहित्यिक-विचारवंतांचा आहे. अभिनंदन करा परंतू वास्तवतेची जाणीव करून देणेही तेवढेच आवश्यक आहे. अर्थात शिवसेनेत प्रवेश घेणाऱ्या पुरोगामी व्यक्तींना त्या वास्तवाची जाणीव नाही, असे नाही. ते आपल्यापेक्षा जास्त अतिहुशार आहेत, म्हणुनच तर ते पक्षांतर करीत आहेत. परंतू अभिनंदनाची फूस देतांना डोक्यावर वजनही ठेवले पाहिजे, हा साधा कॉमन सेन्स आहे. **उद्या जर शिवसेनेने राम-दर्शन यात्रा काढली तर त्याचे नेतृत्व या तथाकथित पुरोगामी असलेल्या उपनेत्यांना करावेच लागेल. या रामदर्शन यात्रेतून धार्मिक-जातीय दंगल उसळली तर त्यात बळी कोणाचे जाणार?**

फुले शाहू आंबेडकरी चळवळ संपविण्यासाठी जातीयवाद्यांना फारसे काही कष्ट घ्यावे लागत नाहीत, कारण चळवळ संपविणारी बीजे चळवळीतच पेरली जातात. प्रचंड यशाच्या शिखरावर पोहोचलेले कांशीरामसाहेब व त्यांची बहुजनसमाज चळवळ भाजपशी युती करता-करता केव्हा संपून गेली हे त्यांनाही कळले नाही. रामविलास पास्वान, रामदास आठवले, अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

**जातीअंताच्या फुलेआंबेडकरी चळवळीत आशेचा सुर्य असलेली नावे आजही आहेत, ही समाधानाची बाब आहे. लालू यादव, करूनानिधी, स्टॅलिन यांच्यासारखी ओबीसी नेत्यांची नावे आपल्याला आजही दिपस्तंभासारखी उभी असलेली दिसतात.** जातीअंताची फुलेआंबेडकरी चळवळ यशस्वी करायची असेल तर लालू-पेरियारसारखे ओबीसी प्रामाणिक व खंबीर ओबीसी नेतृत्वाची गरज आहे. महाराष्ट्रात असे नेतृत्व निर्माण होण्यासाठी आम्ही **"ओबीसी रिपब्लीकन राजकीय आघाडी"** स्थापन केली आहे. पक्षांतरांच्या घावुक बाजार भरलेल्या काळात अशी नवनिर्मितीची घटना दुर्लक्षित राहणे स्वाभाविक आहे

कारण आपणही नकळतपणे ब्राह्मण्यग्रस्तच आहोत, याची जाणीव नसली तरी नेणीव मात्र त्याची नोंद ठेवत असते व योग्यवेळी प्रतिगामी परतावा करीत असते. असाच एखादा विषय घेवून भेटू उद्याही! तोपर्यंत जयजोती, जयजोती, सत्य कि जय हो!

**-उत्तरार्ध-**

माझ्या कालच्या लेखावर प्रतिक्रिया देतांना एक कार्यकर्ता कमेंट पोस्ट करतांना म्हणतो की, पुरोगामी चळवळीतील लोक प्रस्थापित पक्षात जातांना **'सत्ताधारी जमात बना''** हे बाबासाहेब आंबेडकरांचे कोटेशन देतात. प्रस्थापित पक्षात जातांना आपला व्यक्तीगत स्वार्थ लपविण्यासाठी ही माणसं महापुरूषांच्या टोप्या घालतात. वास्तविक महापुरूषांचे विचार संस्कार बनवून 'डोक्यात' घ्यायचे असतात, त्यांच्या टोप्या बनवून 'डोक्यावर' घालायच्या नसतात.

आता सत्ताधारी जमात बनण्यासाठी प्रस्थापित पक्षात जायचे म्हणजे नेमके काय? बरे, हे प्रस्थापित पक्ष अशा जातींनी स्थापन केले आहेत, की जे शेकडो वर्षांपासून तुमच्यावर सत्ताधारी म्हणून सत्ता गाजवित आहेत. गुलामगिरीच्या काळात तुम्ही दासवर्णाचे होते व तुमच्यावर ते स्वामीवर्ण म्हणून सत्ता गाजवित होते. चातुर्वर्णव्यवस्थेच्या काळात तुम्ही शूद्रादिअतिशूद्र वर्णाचे होते व ते ब्राह्मण, बनिया, क्षत्रिय या तीन वर्णाच्या माध्यमातून तुमच्यावर सत्ता गाजवीत होते. त्यानंतर आली जातीव्यवस्था! जातीव्यवस्थेत तुम्ही हीन जातीचे आहेत व ते ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णातून निघालेल्या उच्च-जाती बनून सत्ता गाजवीत आहेत. आता लोकशाही व्यवस्थेत पक्षांची सत्ता असते, म्हणून त्यांनी आपापल्या जातीचे पक्ष स्थापन करून सत्ता मिळवली आहे. ते पक्षप्रमुख असतात व तुमचे लोक तेथे दलाल-गुलाम असतात.

फुले शाहू आंबेडकरांच्या जात्यंतक चळवळीतून लोकशाही व संविधान मिळाल्यावर त्यांनी त्याचा उपयोग करून पक्ष स्थापन केलेत व आज ते या पक्षांच्या माध्यमातून सत्ताधारी झालेले आहेत. **या प्रस्थापित जातींनी जे पक्ष स्थापन केले आहेत ते त्यांच्या जातीची सत्ता टिकवून ठेवण्यासाठी स्थापन केले आहेत, तुम्हा शूद्रांना सत्ताधारी बनविण्यासाठी नाही.** आज या प्रस्थापित जाती स्वतःची सत्ता टिकविण्यासाठी लोकशाही

व संविधान नष्ट करायला निघालेले आहेत, अशा परीस्थितीत ते लोकशाही व संविधान मानणाऱ्या फुलेशाहूआंबेडकरी कार्यकर्त्यांना सत्ताधारी बनण्यासाठी पक्षात प्रवेश देतील काय???

आमचे लातूरचे ओबीसी नेते आण्णाराव पाटील नेहमी म्हणतात, **"आपल्याला सत्तेत बसवून ते काय शेळ्या-मेंढ्या चारायला जातील का???" "कुणबटांना असेंब्लीत निवडून आणून आम्ही ब्राह्मणांनी काय शेतात जाऊन नांगर हाकायचा काय?"** हेच टिळकांना म्हणायचे होते! सत्तेसाठी ब्राह्मणांच्याविरोधात लढणारे त्यावेळचे कुणबट आज मराठा-सरंजामदार झालेले आहेत व स्वजातीचे पक्ष स्थापन करून सत्ताधारी-जमात बनलेले आहेत. मराठा जात सत्ताधारी बनल्यावर तीही इतर शूद्र जातींना सत्तेपासून वंचित ठेवण्याचेच काम करीत आहे. उद्या माळी किंवा धनगर जात अशाच काही कारणास्तव सत्ताधारी झाल्यात तर त्याही इतर शूद्रांना अशाच सत्तेपासून वंचित ठेवतील, यात शंका नाही. जोपर्यंत जातीव्यवस्था जिवंत व बळकट आहे, तोपर्यंत ब्राह्मण जात प्रथम सत्ताधारी राहील, फक्त दुय्यम स्थानावरच्या सत्ताधारी जाती बदलत राहतील. बौद्ध म्हणविणारे महार लोक जरी उद्या सत्ताधारी झालेत, तरी सत्तासोपानाच्या या जातीरचनेत काहीही फरक पडणार नाही.

तेव्हा प्रश्न सत्ताधारी होण्याचा नाही, तर एकूणच व्यवस्था बदलण्याचा आहे. व्यवस्था बदलण्यासाठी सत्ताधारी जमात बनायचे आहे. डॉ. बाबासाहेबांना हेच अभिप्रेत होते. ''सत्तेवाचूनी सकळ कळा, झाल्या अवकळा, पुसा मनाला!!'' हे तात्यासाहेब महात्मा फुलेंचे म्हणणे याच अर्थाने घेतले पाहिजे. जे फुले आंबेडकर जातीव्यवस्थाच नष्ट करायला निघालेले होते, ते कोणत्या तरी एका जाती-जमातीने सत्ताधारी होण्याचे सूचवतीलच कसे? सत्ताधारी जमात म्हणजे सत्ताधारी क्लास वा समाजघटक जो जात्यंतक तत्वज्ञान स्वीकारून सत्तेचा वापर जातीअंतासाठी करेल. **त्यांनी आयुष्यभर जात्यंतक तत्वज्ञानाची उभारणी केली ती केवळ एखाद्या जातीला सत्तेत बसविण्यासाठी नाही.**

जवळ जवळ सर्वच बहुजन जातींमध्ये हा गोड गैरसमज आहे की, आपल्या जातीतून जास्तीतजास्त आमदार-खासदार निवडून दिलेत, जास्तीतजास्त मंत्री झालेत

की आपण झालो सत्ताधारी! तुमच्या जातीचा माणूस मंत्री मुख्यमंत्रीच काय, प्रधानमंत्री व राष्ट्राध्यक्ष झाल्यावरही तुमची जात सत्ताधारी होणे तर दुरच, तुमच्या जातीचा साधा विकासही होऊ शकत नाही, हे वसंतराव नाईक, छगन भुजबळ, गेहलोत, मोदी, कोवीन्द यांनी सिद्ध केले आहे आणी आता द्रोपदी मुर्मूही तेच सिद्ध करणार आहेत. **एखाद्या जातीत प्रस्थापित पक्षांच्या तिकीटावर आमदार-खासदारांची संख्या वाढणे, म्हणजे दलाल-भडव्यांची संख्या वाढणे. दलालांची संख्या जितकी जास्त तितका समाज जास्त विकला जाणार व जास्त खड्यात जाणार!**

आर.एस.एस ने शिवसेनेला सत्ताधारी ब्राह्मणी छावणीत घेण्यासाठी 1994-95 साली त्यांचे केडर कॅम्प घेतले होते. त्याआधी महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणात झालेल्या बाबा पुरंदरेंच्या व्याख्यानातून शिवसैनिकांची वैचारिक मशागत झालेली होतीच! **शिवसेनेला शेंडी-जाणव्याच्या हिंदुत्वाची दिक्षा दिल्यावरच भाजपाने युती केली होती.** ब्राह्मणी छावणीतही फुट पडू शकते, यात वाद नाही. परंतू आता पडलेली ही फुट राजकीय आहे, वैचारिक नाही. शिवसेना भाजपाच्या युतीतून मुक्त होऊन कॉग्रेस-राष्ट्रवादीसारख्या लोकशाहीवादी व धर्मनिरपेक्ष पक्षाच्या आघाडीत आली, याचा अर्थ शिवसेना पुरोगामी झाली काय? अशा पुरोगामी शिवसेनेला बळ देण्यासाठी पुरोगाम्यांनी शिवसेनेत जावे काय? शिवसेनेत गेलेले पुरोगामी डायरेक्ट उपनेते बनतात, ही चांगली गोष्ट आहे. शिवसेनेत उपनेते बनने म्हणजे पक्षाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी होता येणे. पक्षांतर्गत मिळालेल्या या सत्तेचा सदुपयोग करीत ह्या पुरोगामी नेत्यांनी शिवसेनेचे पुरोगामीत्व भक्कम करण्यासाठी पुढील कृती कार्यक्रम हाती घेतला पाहिजे-

1) आर.एस.एस ने ज्याप्रमाणे शिवसेनेला ब्राह्मणी बनविण्यासाठी शिवसैनिकांचे केडर कॅम्प घेतलेत, तसे केडर कॅम्प शिवसेनेत गेलेल्या पुरोगामी नेत्यांनी घेतले पाहिजेत.
2) प्रबोधनकार ठाकरे यांचे साहित्य मोठ्याप्रमाणात प्रकाशित करून ते शिवसैनिकांना नाममात्र किंमतीत दिले पाहिजे.

असे अजून अनेक कृतीकार्यक्रम सूचविता येतील. परंतू आपल्या पुरोगाम्यांची औकात पाहता उपरोक्त दोन कार्यक्रमही पुरेसे आहेत. **शिवसेनेत गेलेल्या ताईचे अभिनंदन ज्यांनी ज्यांनी केलेले आहे, त्यांची ही नैतिक जबाबदारी आहे की, त्यांनी उपरोक्तप्रमाणे कृतीकार्यक्रमाचा आशय असलेले पत्र या ताईंच्या नावे पाठवले पाहिजे. अशी हजार पत्रे जरी गेलीत तरी त्या ताईवर शिवसेनेला पुरोगामी बनविण्याचे दडपण येईल.** फाटाफुटीच्या लढाईत अस्तित्वच पणाला लागलेले असतांना शिवसेनाप्रमुखही तुमच्या पत्रांचा निश्चित विचार करतील व उपरोक्त कृतीकार्यक्रम राबवतील. कट्टर ब्राह्मणी छावणीतून बाहेर पडलेल्या शिवसेनासारख्या रेडीमेड पक्षाला जात्यंतक पुरोगामी बनविण्याची फार मोठी संधी चालून आलेली आहे. **एकतर एखाद्या रेडीमेड राजकीय पक्षाला पुरोगामी बनवून फुलेआंबेडकरांचे जात्यंतक स्वप्न पूर्ण करा किंवा स्वतःचा जात्यंतक पक्ष निर्माण करा. शिवसेनेचा पहिला पर्याय तुमच्यासमोर आहेच, तामीळनाडूच्या धर्तीवर “ओबीसी-रिपब्लीकन राजकीय आघाडी” स्थापन करून दुसरा पर्यायही आम्ही दिलेला आहेच.** कोणत्याही एका पर्यायाची ताबडतोब निवड करा व कामाला लागा, अन्यथा पेशवाईचा ब्रह्मसैतान तुमचा घास घेण्यासाठी तुमच्या दारात येऊन ठेपलेला आहेच! जयजोती, जयजोती, सत्य कि जय हो!

**लेखक- प्रा. श्रावण देवरे**

**संपर्क मोबाईल- 88 301 27 270**

**ईमेल-** s.deore2012@gmail.com